# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.01.2026** **वारःशुक्रवार**

---

1. स्टार्टअप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातले उद्योजक एकत्रितपणे भारताचं भविष्य घडवतील, असा पंतप्रधानांना विश्वास,
2. प्रभासपट्टणमध्ये वेदमंत्रोच्चारांच्या गजरात सोमनाथ स्वाभिमान पर्व उत्साहात सुरू,
3. जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद पूर्णपणे संपवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा अमित शहा यांचा पुनरुच्चार आणि
4. खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष संघाची उपांत्य फेरीत धडक.

**<u>मोदी</u>**

'स्टार्टअप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातले उद्योजक एकत्रितपणे भारताचं भविष्य घडवतील', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. येत्या फेब्रुवारी मध्ये भारतात होणाऱ्या 'इंडिया ए आय इम्पॅक्ट समिट 2026' या परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी काल नवी दिल्ली इथं त्यांच्या निवासस्थानी ए-आय अर्थात म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या भारतीय स्टार्टअप्सची गोलमेज बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. 'ए-आय फॉर ऑल: ग्लोबल इम्पॅक्ट चॅलेंज', अशी या परिषदेची संकल्पना असून त्यामध्ये सहभागी होण्यासाठी निवड झालेले 12 भारतीय 'ए-आय' स्टार्टअप्स या बैठकीला उपस्थित होते.

**<u>स्वाभिमान पर्व</u>**

वारंवार झालेल्या हल्ल्यांनंतरही भाविकांच्या अढळ श्रद्धा आणि दृढनिश्चयामुळे सोमनाथ मंदिर पुन्हा पुन्हा उभारलं गेल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सन 1026 मध्ये गझनीच्या महमूदने सोमनाथवर केलेल्या पहिल्या आक्रमणाला 2026 मध्ये एक हजार वर्षे पूर्ण होत असून 1951 मध्ये पुनर्निर्मित मंदिराच्या जीर्णोद्धाराला यंदा 75 वर्षे पूर्ण होत आहेत. याप्रीत्यर्थ चार दिवसीय 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' उत्सव काल गुजरातच्या समुद्रकिनारी असलेल्या प्रभासपट्टण या शहरात सुरू झाला.

संपूर्ण गुजरातभरातील सुमारे 2500 ऋषिकुमार या अखंड वैदिक मंत्रोच्चारासाठी समुद्रकिनाऱ्यावर जमले होते. यावेळी देशभरातली शिवमंदिरं एकाच वेळी मंत्रोच्चारात सहभागी झाली होती. 3 हजार ड्रोन असलेला ड्रोन-शो, 72 तासांचा 'ओमकार नाद' आणि भव्य 'शौर्य यात्रा' ही उद्घाटन पर्वाची वैशिष्ट्य होती. नागरिकांनी आपल्या आठवणी 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' या हॅशटॅगवर पाठवून या पर्वामध्ये सहभागी होण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं. पंतप्रधान 11 तारखेला 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा' मध्ये सहभागी होणार आहेत.

**<u>शहा</u>**

'जम्मू आणि काश्मीरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि दहशतवाद पूर्णपणे संपवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे,' असा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केला. काल नवी दिल्ली इथं शहा यांच्या अध्यक्षतेखाली जम्मू आणि काश्मीरच्या सुरक्षा व्यवस्थेचाआढावा घेणारी बैठक पार पडली, त्यावेळी त्यांनी हे प्रतिपादन

केलं. दहशतवादविरोधी कारवाया, दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणं आणि दहशतवाद्यांना वित्तपुरवठा थांबवण हे सातत्यानं सुरू ठेवावं, असं त्यांनी सांगितलं. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या सतत आणि समन्वित प्रयत्नांमुळे जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद संपुष्टात येत आहे यावर त्यांनी भर दिला.

**प्रगती-गौबा**

'प्रगती' या व्यासपीठामुळं देशातल्या पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीला गती आल्याचं प्रतिपादन माजी कॅबिनेट सचिव आणि नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांनी केलं आहे. आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. 'प्रगती'च्या अंतर्गत आढावा घेतला जात असलेल्या काही प्रकल्पांची निवड खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यात नवी मुंबई विमानतळ, चिनाब नदीवरचा रेल्वे पूल, आसाममधला बोगीबीळ पूल यांचा समावेश असल्याचं गौबा यांनी सांगितलं. आकाशवाणीच्या वाहिन्या तसंच NEWSONAIROFFICIAL या युट्युब चॅनलवर आणि NewsOnAIR या ॲपवर आज रात्री साडे 9 वाजता ही पूर्ण मुलाखत ऐकता येणार आहे.

**गडकरी**

अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता 25 हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जखमी व्यक्तीला रोखरहित उपचार दिले जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं. केंद्रीय महामार्ग आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी काल सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यांची वार्षिक बैठक घेतली. रस्ते वाहतुकीत सुरक्षा, प्रवाशांची आणि सर्वसामान्यांची सोय, व्यवसायानुकूल वातावरण आणि वाहनविषयक नियम अशा विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. परिवहन हा विषय राज्य आणि केंद्राच्या समावर्ती सूचीतला असून त्यामुळे अशा प्रकारचा संवाद सक्षम, सुरक्षित आणि नागरिककेंद्रीत उपायांना पूरक ठरतो, असं गडकरी यावेळी म्हणाले.

**रेल्वे-पुरस्कार**

रेल्वे क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे 100 अधिकारी आणि सर्वोत्तम कामगिरी करणारे प्रभाग अशा श्रेणीतील सत्तराव्या अतिविशिष्ट रेलसेवा पुरस्काराचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं वितरण होणार आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान आव्हानात्मक परिस्थितीत अखंड रेल्वे सेवा सुनिश्चित केलेल्या आणि मदतकार्य सुलभ करण्यात योगदान देणाऱ्या अधिकाऱ्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे. भारतीय रेल्वेमधील सेवा आणि उत्कृष्ट योगदानासाठी हे पुरस्कार देण्यात येत आहेत. नावीन्य, कार्यक्षमता, सुरक्षा, महसूलवाढ, प्रकल्पांची वेळेवर पूर्तता, क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी आणि विविध क्षेत्रातील सेवा अशा श्रेणींचा पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे.

**वस्त्रोद्योग मंत्रालय**

वस्त्रोद्योग मंत्रालयाने काल गुवाहाटी इथं आयोजित केलेल्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंत्री परिषदेत जिल्हास्तरीय नेतृत्वाखाली सुरू केल्या जाणाऱ्या वस्त्रोद्योग परिवर्तन उपक्रमाचं उद्घाटन केलं. वस्त्रोद्योग मंत्रालयानं जाहीर केलेल्या माहितीनुसार, हा एक धोरणात्मक उपक्रम असून देशाच्या वस्त्रोद्योग क्षेत्रात समावेशक आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी तो आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यांचं तज्ज्ञ जिल्हे आणि आकांक्षी जिल्ह्यांमध्ये वर्गीकरण करण्यात आलं आहे.

**परिषद**

केंद्रीय निवडणूक आयोगानं येत्या 21 ते 23 जानेवारी दरम्यान 'लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन- 2026' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. त्याच्या पूर्व तयारीसाठी निवडणूक आयोगानं काल नवी दिल्ली इथं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक घेतली. निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाही क्षेत्रातली भारतात होणारी ही

आतापर्यंतची सर्वात मोठी जागतिक परिषद असेल. यामध्ये जगभरातल्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे सुमारे 100 प्रतिनिधी सहभागी होतील.

**निदर्शन**

इराणमध्ये महागाईविरोधात तीव्र निदर्शनं सुरू असताना सरकारनं इंटरनेट आणि संप्रेषण बंड केलं होतं. तडीपार इराणी युवराज रझा पहलवी यांनी त्याबद्दल इराण सरकारचा निषेध केला. त्यांनी सर्व युरोपीय नेत्यांना इराणी लोकांना पाठिंबा देण्यासाठी आणि राजवटीला जबाबदार धरण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाचं अनुसरण करण्याचं आवाहन केलं. पहलवी यांनी निदर्शकांना पाठिंबा दिल्याबद्दल समाजमाध्यमांवर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आभार मानले आणि इराणमध्ये संप्रेषण पुन्हा पूर्ववत करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक आणि राजनैतिक प्रयत्न करण्याचं आवाहन केलं. आर्थिक अडचणींबद्दल इराणमध्ये हजारो लोक निदर्शनं करत असून उपाध्यक्ष जेडी व्हान्ससह अमेरिकेनं शांततापूर्ण निदर्शकांना पाठिंबा देण्याचा पुनरुच्चार केला आहे.

**मराठी संमेलन**

'शोध मराठी मनाचा' हे 21 वं जागतिक मराठी संमेलन आजपासून 3 दिवस पणजी इथे सुरू होत आहे. हे संमेलन जागतिक मराठी अकादमी आणि गोवा राज्य आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पणजीतल्या कला अकादमी इथे पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असून यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सामंत, महाराष्ट्राचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**खेलो इंडिया**

दीवमध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहेत. काल पुरूषांच्या बीच सॉकरमध्ये अंदमान आणि निकोबारला हरवून महाराष्ट्राने उपांत्य फेरीत मुसंडी मारली. पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राने 2 रौप्य पदकांची कमाई करीत दिवस गाजविला.

पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने रूपेरी यश संपादन केलं. मात्र महिलांच्या सांघिक प्रकारात ओरीसाकडून 580-576 गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. महाराष्ट्राच्या जयश्री शेटे, क्रिनाशी येवले आणि अशिता यादवने रौप्य पदक मिळवलं. पुरूषांच्या सांघिक प्रकारात तामिळनाडूने 606 गुण तर महाराष्ट्राने 575 गुण संपादून अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदकं जिंकली. महाराष्ट्राकडून अंशुल कांबळे, अनुज सरनाईक आणि मुकेश चौधरीने रूपेरी यशावर नाव कोरलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.